# महाराष्ट्र लोकसेवा आयोग
## Maharashtra Public Service Commission

मुख्य कार्यालय : ५½, ७ व ८ वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई ४०००२१ दूरध्वनी - २२८२१७२८, २२८२११६७
फोर्ट कार्यालय : बँक ऑफ इंडिया इमारत, ३ रा माळा, फोर्ट, मुंबई ४००००१ दूरध्वनी :२२६७०२१०/१४८/२४८,२२१०२२२२. फॅक्स : २२६७३९१५

ई-मेल – sec.mpsc@maharashtra.gov.in वेबसाईट - www.mpsc.gov.in, https://mahampsc.mahaonline.gov.in


**एनओटी-३६१८/सीआर-३१/२०१८/नऊ** **दिनांक : १ नोव्हेंबर, २०१९**

**दिवाणी न्यायाधीश (कनिष्ठ स्तर ) व न्यायदंडाधिकारी (प्रथम वर्ग) (मुख्य) परीक्षा-२०१९**

**(जाहिरात क्र. ११/२०१९)**

# घोषणा

महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे दिनांक १ सप्टेंबर, २०१९ रोजी घेण्यात आलेल्या **दिवाणी न्यायाधीश (कनिष्ठ स्तर ) व न्यायदंडाधिकारी (प्रथम वर्ग) (मुख्य) परीक्षा-२०१९ चा** निकाल दिनांक ३१ ऑक्टोबर, २०१९ रोजी प्रसिध्द करण्यात आला आहे. सदर निकालानुसार अर्हताप्राप्त ठरलेल्या उमेदवारांच्या मुलाखतीचा तपशिलवार कार्यक्रम आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आला आहे.

मुलाखतपत्रे संबंधीत उमेदवारांना त्यांच्या Profile मध्ये उपलब्ध करुन देण्यात येतील. अत्यंत अपरिहार्य कारणाशिवाय मुलाखतीचा दिनांक बदलून देण्याची विनंती मान्य केली जाणार नाही. उमेदवारांनी मुलाखतीस येताना मुलाखतपत्राची प्रत घेऊन येणे व त्यातील सूचनांचे काटेकोरपणे पालन करणे आवश्यक आहे. मुलाखतीच्या वेळेस अर्जात दावा केल्या पृष्ठर्थ आवश्यक सर्व मूळ प्रमाणपत्रे / सर्व गुणपत्रके निगडीत असणारी विहित प्राधिका-यांनी दिलेली अनुभव प्रमाणपत्रे इ. सादर करणे अनिवार्य आहे. त्यासाठी कोणतीही मुदतवाढ दिली जाणार नाही व अशा उमेदवारांची मुलाखत घेण्यात येणार नाही याची कृपया संबंधित उमेदवारांनी नोंद घ्यावी.

उपसचिव (परीक्षा),
महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई.